# तदर्थ वैद्यकिय अधिकारी पदाकरीता अर्ज करणाऱ्या एम.बी.बी.एस. उमेदवारांसाठी सुचना दिनांक २८/०१/२०२६

कार्यालयामध्ये तदर्थ वैद्यकिय अधिकारी पदाकरीता अर्ज केलेल्या सर्व एम.बी.बी.एस. उमेदवारांना सुचित करण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येवुन प्रत्येक गुरुवारी उपलब्ध जागेनुसार एकास पाच पध्दतीने उमेदवारास दुरश्वनीवरुन संपर्क केला जात असे व उपस्थित उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात येत होते.

सध्यस्थितीत कार्यालयास मागिल वर्षापासुन एकुण १४१ अर्ज प्राप्त आहेत, ज्यावेळी रिक्त पदांच्या अनुशंगाने कार्यालयातुन गुणवत्तेनुसार उमेदवांना दुरध्वनीवरुन समुपदेशबाबत कळविण्यात येते तेव्हा बरेच उमेदवार हे दुसरीकडे रुजु असल्याचे किंवा पि.जी. ला नंबर लागलेला असल्याचे समजते, त्यामुळे प्रत्येकवेळी भरपुर उमेदवारांना कार्यालयातुन संपर्क करावा लागतो, सदर प्रक्रिया हि खुप वेळखाऊ आहे तसेच बरेचवेळा रिक्त जागानुसार उमेदवार उपस्थित राहात नाही, त्यामुळे जागा रिक्त राहतात आणि याचा परिणाम आरोग्य सेवेवर होतो.

वरील बाबींवर मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार आजपर्यंत कार्यालयास प्राप्त सर्व अर्ज रद्द करण्यात आहे. यापुढे कार्यालयातुन उमेदवारांना कोणत्याही प्रकारची सुचना (दुरध्वनी, ई-मेल किंवा इतर माध्यमातुन) देण्यात येणार नाही. यापुढे कार्यालयास उमेदवाराने अगाऊ अर्ज करण्याची आवश्यकता नाही. ज्या उमेदवारांना तदर्थ पदावर काम करण्याची इच्छा आहे त्यांनी प्रत्येक गुरुवारी प्रत्यक्ष कार्यालयात मुळ कागदपत्रासह सकाळी १२:०० वाजेपर्यंत उपस्थित रहावे, त्यानंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जानार नाही. दुपारी १२:०० वाजेपर्यंत उपस्थित असलेल्या उमेदवारांमधुन गुणवत्तेप्रमाणे रिक्त पदांच्या अनुशंगाने समुपदेशन घेण्यात येईल व गुणवत्तेनुसार नियुक्ती देण्यात येईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

(डॉ.दत्तात्रय बिराजदार)
सदस्य सचिव,
जिल्हानिवड समीती
तथा जिल्हा शल्य चीकीत्सक,
बुलडाणा